# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.06.2024** **वार – शुक्रवार**

---

**पवार-पालखी आढावा**

आषाढी पालखी सोहळ्या दरम्यान वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधांचं नियोजन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. पालखी सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आज पुण्यात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. वारी दरम्यान दुर्घटना घडल्यास शासनातर्फे आर्थिक सहकार्य करण्यात येईल, असं पवार यांनी यावेळी सांगितलं. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी यावेळी सुरक्षा आणि वाहतूक नियोजनाबाबत माहिती दिली. पुणे जिल्ह्यातली वारीसाठीची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

**हर्षवर्धन पाटील**

ऊसाच्या एफ आर पी मध्ये दरवर्षी वाढ होत असूनही गेली अनेक वर्षे साखरेच्या किमान विक्री दरात वाढ झालेली नाही. त्यामुळे साखर उद्योगापुढील आर्थिक अडचणी वाढत आहेत. साखरेचा किमान विक्री दर प्रती किलो 42 रुपये करण्याचा प्रस्ताव, केंद्र सरकारला सादर करण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आज पुण्यात दिली. या बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**फिक्की**

महिलांनी उद्योग, व्यवसायात मोठ्या प्रमाणात पुढे येण्याची गरज असल्याचे मत पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश रजपूत यांनी व्यक्त केले. फिक्की महिला आघाडीच्या वतीनं पुण्यात आयोजित महिला उद्योजकता मेळाव्यात ते बोलत होते. महिलांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या, नव उद्योजक घडवण्यासाठीच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**रेल्वे स्थानक**

पुणे रेल्वे स्थानकावरील उपलब्ध मर्यादित फलाट आणि गाड्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन मध्य रेल्वेने पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारीकरणाची योजना आखली आहे. या योजनेअंतर्गत पुणे रेल्वे स्थानकावर मालधक्का परिसरात आणखी किमान 4 फलाट नव्यानं बांधण्याचं नियोजन करण्यात येत असून त्याबद्दलचा अधिकृत प्रस्ताव रेल्वे मंडळाकडं सादर करण्यात आला आहे.

**अर्चना गायकवाड**

पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी पदावर अर्चना गायकवाड यांची नियुक्ती झाली. त्यांनी आज पदभार स्विकारला.

**प्रादेशिक परिवहन**

जनावरांच्या वाहतूकीसंदर्भातील नियमांचे पालन करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवडच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयानं केलं आहे. जनावरांच्या वाहतुकीपूर्वी वाहतूकदारांनी वाहनांच्या बांधणीत योग्य बदल करुन आणि वाहनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करुन विशेष परवाना घेणे बंधनकारक असल्याचं कार्यालयानं स्पष्ट केले आहे.

**<u>हिवताप रुग्ण</u>**

पावसामुळे राज्यात कीटकजन्य आजारांमध्ये वाढ होऊ लागली आहे. यावर्षी जानेवारी ते मेपर्यंत हिवतापाचे 3 हजार 62 रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा हिवतापाच्या रुग्णांची संख्या 40 टक्क्यांनी वाढली आहे. त्यामुळे पुणेकरांनी आरोग्याची काळजी घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

**<u>कॉलरा</u>**

पिंपरी चिंचवड शहरात कॉलराचा संसर्ग झालेल्या तीन रुग्णांवर महापालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सद्यस्थितीत तिन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. महानगरपालिकेच्या वतीनं रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून, या भागातील पाण्याचे नमुने महानगरपालिका तसेच शासनाच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. नागरिकांना पाणी उकळून पिण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>अभ्यासक्रम</u>**

शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात पुढील महिन्यापासून बी ए नागरी सेवा हा 4 वर्षांचा स्वतंत्र पदवी अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष एस. के. जैन यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. नागरी आणि संरक्षण सेवांमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होणार असल्याचं जैन यांनी सांगितलं.

**<u>डेपो</u>**

पुणे महापालिकेच्या औंध इथल्या जकात नाक्याच्या जागेवर पुणे महानगर परिवहन महामंडळाचा डेपो उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज ही माहिती दिली. बंद पडलेल्या या जागांवर पीएमपीचे पार्किंग किंवा सरकारी कार्यालये उभी करावीत, असे पर्याय पुढे आले होते . त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>स्मार्ट मीटर विरोधात आंदोलन</u>**

शासनाच्या विजेचे स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याच्या धोरणाविरोधात आज आम आदमी पक्षाच्या वतीने महावितरणाच्या रस्ता पेठ इथल्या मुख्य कार्यालयाबाहेर आंदोलन करण्यात आले. शासन काही ठराविक उद्योगपतींच्या हितासाठी स्मार्ट प्रीपेड मीटर लावून नागरिकांची फसवणूक करत असल्याचा आरोप आप नं केला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारी ढगाळ हवामान होतं .उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**